# लोकमत आणि व्हिस्पर चॉईस तर्फे आरोग्य आणि स्वच्छतेवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन



लोकमत आणि व्हिस्पर चॉईस तर्फे घेण्यात आलेल्या आरोग्यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शनाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद

नांदेड : लोकमत आणि व्हिस्पर चॉइस तर्फे दि. १७ रोजी देगलूर येथे घेण्यात आलेल्या उपक्रमांतून महाविद्यालयीन मुलींना मासिक पाळीतील आरोग्य आणि स्वच्छतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मासिक पाळीच्या वस्तुस्थितीबद्दल महाविद्यालयीन मुलींशी बोलणाऱ्या स्त्रीरोगतज्ज्ञांनी मुलींनी मासिक पाळीच्या काळात काय करावे आणि काय करू नये, यावर मोलाची माहिती दिली. सॅनिटरी पॅड की कापड वापरावे, यावर चर्चा झाली. तज्ज्ञांनी कापड वापरण्याबद्दल तथ्ये आणि त्यामुळे मासिक पाळीदरम्यान ओलेपणा आणि अस्वस्थता जाणवण्याची समस्याही समजावून सांगितली. व्हिस्पर चॉइस सॅनिटरी पॅडसारख्या सॅनिटरी नॅपकिन्समध्ये ओलेपणा आणि अस्वस्थता येत नाही, याची खात्री होते.

यावेळी मुलींना स्त्रीरोगतज्ज्ञांनी मार्गदर्शन करून आरोग्य स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. खेळ आणि भेटवस्तू स्त्रीरोगतज्ज्ञांनी मुलींना दिलेल्या या मौल्यवान माहितीशिवाय, कार्यक्रमाचा एक अतिशय मनोरंजक भागदेखील होता, जिथे मुलींना रस वाटला. मुलींनी एकमेकींशी व तज्ज्ञांशी संवाद साधला. मुलींनी संगीत, गायन आणि नृत्य सादर केले; तसेच काही रोमांचक छोटे खेळदेखील खेळले. मुलींना मोफत व्हिस्पर चॉइस सॅनिटरी पॅडचे नमुने आणि इतर भेटवस्तूही मिळाल्या.



सेल्फी बुथवर सेल्फी घेताना महाविद्यालयातील विद्यार्थिनी.



महाविद्यालयातील युवतींनी विविध स्पर्धेत सहभाग घेतला होता.



कार्यक्रमात डॉ. निकिता चव्हाण मार्गदर्शन करताना.



घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ आणि उपप्राचार्य अनिल चिद्रावार.

Scanned with OKEN Scanner